पुढारी

दि. 30/10/2023

# सॉफ्ट स्किल अँड ॲप्टिट्यूड प्रशिक्षणास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील बी. एसस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), बी.सी.एस., बी.सी.ए. मधील विद्यार्थ्यांसाठी सॉफ्ट स्किल अँड ॲप्टिट्यूडचे प्रशिक्षणास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या वतीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. जी. टी. टी. पुणे कंपनीचे ट्रेनर अमेय गोखले, सचिन भोसले यांनी विद्यार्थ्यांना ट्रेनिंग दिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. डॉ. संजय लठ्ठे, प्रा. डॉ. राजश्री पाटील आदींनी परिश्रम घेतले.

पुढारी
दि. 30/10/2023

# तृणधान्याचा वापर रोजच्या आहारात आवश्यक : डॉ. काळे

**कोल्हापूर :** रोजच्या आहारात तृणधान्याचा वापर आवश्यक आहे, असे प्रतिपादन अकोला येथील प्रा. डॉ. संध्या काळे यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागातर्फे 'प्रमोटिंग फूड : मिलेट्स' विषयावरील वेबिनारमध्ये त्या बोलत होत्या. त्यांनी तृणधान्य (मिलेट्स) म्हणजे काय, त्याचे प्रकार व त्यातील पोषक घटक याविषयी माहिती दिली. डॉ. ऊर्मिला खोत यांनी प्रास्ताविक केले. योगिता पाटील यांनी आभार मानले. सई पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली व आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.